Scholars World
INTERNATIONAL PEER REVIEWED REFEREED MULTIDISCIPLINARY JOURNAL OF CONTEMPORARY REASERCH
Impact Factor: 4.433
Online ISSN: 2320-3145, Print ISSN: 2319-5789

शाश्वत विकास आणि उच्च शिक्षण : विद्यार्थ्यांमधील जागरूकतेचा अभ्यास

प्रा. सचिन संतोष पवार (भूगोल विभाग)

कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे कला, वाणिज्य आणि विज्ञान महविद्यालय, सटाणा ता. बागलाण जि नाशिक

सारांश:

या संशोधनाचा उद्देश महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील शाश्वत विकासाबाबतची जागरूकता आणि पर्यावरण संरक्षणाबाबतचा दृष्टिकोन यांचा अभ्यास करणे हा आहे या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून दुय्यम स्रोतांद्वारे माहिती .गोळा करून या संशोधनातून विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत काही प्रमाणात जागरूकता आहे. पर्यावरण संरक्षणाबाबत असणारा दृष्टिकोन तसेच महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणारे ग्रीन कॅम्पस, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि पर्यावरण जनजागृती कार्यक्रम यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव वाढण्यास कशी मदत होईल त्या दृष्टीने शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते यावर अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तावना

आजच्या आधुनिक युगात औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज या तिन्ही क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. नैसर्गिक संसाधनांचा वाढता वापर, पर्यावरणीय प्रदूषण, हवामान बदल, जैवविविधतेचे नुकसान आणि सामाजिक असमानता या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. या समस्यांवर उपाय म्हणून शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. शाश्वत विकास म्हणजे वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही अशा पद्धतीने विकास साधणे होय. या संकल्पनेत पर्यावरणीय संरक्षण, आर्थिक प्रगती आणि सामाजिक समता यांचा समतोल साधण्यावर भर दिला आहे. त्यामुळे शाश्वत विकास ही केवळ पर्यावरणाशी संबंधित संकल्पना नसून ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाशीही निगडित आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. महाविद्यालये आणि विद्यापीठे ही केवळ ज्ञान देणारी केंद्रे नसून ती समाजातील मूल्ये, जबाबदारी आणि जागरूकता निर्माण करणारी महत्त्वाची संस्था आहेत. विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाची संकल्पना समजावून देणे, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हे उच्च शिक्षण संस्थांचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

उच्च शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत असतो. महाविद्यालयांमध्ये ग्रीन कॅम्पस उपक्रम, वृक्षारोपण कार्यक्रम, ऊर्जा बचत, जलसंवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण शिक्षण यांसारख्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणीय समस्यांची जाणीव होते तसेच त्यांच्यात सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होते आहे.

आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आणि धोरणनिर्माते आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्यामध्ये शाश्वत विकासाबद्दल योग्य ज्ञान आणि जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. जर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, संसाधनांचा योग्य वापर आणि सामाजिक समतेबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला, तरच भविष्यात समाजात शाश्वत विकास साध्य करणे अधिक सुलभ होणार आहे या संदर्भात विद्यार्थ्यांमधील शाश्वत विकासाबाबत असलेली जागरूकता, त्यांचा दृष्टिकोन आणि उच्च शिक्षण संस्थांनी केलेले प्रयत्न यांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे प्रस्तुत संशोधनाचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमधील शाश्वत विकासाबाबतची जागरूकता कितपत आहे, तसेच उच्च शिक्षण संस्थांमधील विविध उपक्रमांद्वारे ती कशी वाढवता येईल याचा अभ्यास करणे म्हत्वाचे आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives)

1. विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत असलेल्या जागरूकतेचा अभ्यास करणे.
2. विद्यार्थ्यांचा पर्यावरण संरक्षणाबाबत असलेला दृष्टिकोन समजून घेणे.
3. शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका स्पष्ट करणे.

गृहितक (Hypothesis)

1. उच्च शिक्षण हे विद्यार्थ्यांना शाश्वत विकासात काही प्रमाणात जागरूकता निर्माण होत आहे.
2. शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.

संशोधन पद्धती (Research Methodology)

या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरण्यात केला आहे. या अभ्यासामध्ये विद्यार्थ्यांमधील शाश्वत विकासाबाबत असलेली जागरूकता, त्यांचा दृष्टिकोन यांचा अभ्यास करण्यासाठी ही पद्धती उपयुक्त ठरते. म्हणून या संशोधनासाठी आवश्यक माहिती दुय्यम स्रोतांद्वारे माहिती संकलित केली आहे. व दुय्यम माहिती मिळविण्यासाठी विविध पुस्तके, संशोधन लेख, शैक्षणिक नियतकालिके, इंटरनेटवरील विश्वसनीय संकेतस्थळे तसेच शासकीय अहवाल यांचा संदर्भ घेतला आहे.

विषयाचे विश्लेषण

१. विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत असलेल्या जागरूकतेचा अभ्यास

"वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न आणणारा विकास म्हणजे शाश्वत विकास**."** आजच्या काळात पर्यावरणीय समस्या, हवामान बदल, पाण्याची टंचाई, जैवविविधतेचे नुकसान आणि प्रदूषण यांसारख्या समस्यांमुळे शाश्वत विकासाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची असल्याने या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत किती जागरूकता आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणून या अभ्यासातून असे दिसते की अनेक विद्यार्थ्यांना शाश्वत विकास या संकल्पनेची प्राथमिक माहिती आहे. परंतु त्यांना पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि ऊर्जा बचत यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजलेले असले तरी महाविद्यालयांमध्ये साजरे केले जाणारे पर्यावरण दिन, पृथ्वी दिन, वृक्षारोपण मोहिमा, स्वच्छता अभियान यांसारख्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होते. तसेच अनेक विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाच्या व्यापक संकल्पनेबद्दल सखोल माहिती नसल्याचेही आढळून आल्याने शाश्वत विकास हा केवळ पर्यावरणाशी संबंधित विषय नसून तो सामाजिक समता, आर्थिक विकास आणि नैसर्गिक संसाधनांचे संतुलित व्यवस्थापन यांच्याशी संबंधित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना या संकल्पनेची सखोल माहिती देणे आणि त्यांना प्रत्यक्ष कृतीत सहभागी करून घेणे हे उच्च शिक्षणांतून घडत आहे.

२. विद्यार्थ्यांचा पर्यावरण संरक्षणाबाबत असलेला दृष्टिकोन समजून घेणे

पर्यावरण संरक्षणाबाबत विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने विद्यार्थ्यांचा पर्यावरणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन असेल तर भविष्यात ते पर्यावरणपूरक निर्णय घेण्यास सक्षम असतील या संशोधनातून असे आढळून येते की बहुतेक विद्यार्थ्यांचा पर्यावरण संरक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन आहे. ते विद्यार्थी प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, वृक्षारोपण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्वच्छता राखणे यांसारख्या बाबींचे महत्त्व माहिती आहे. काही विद्यार्थी महाविद्यालयात किंवा समाजात आयोजित करण्यात येणाऱ्या पर्यावरणीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात.मात्र, काही विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता असूनही प्रत्यक्ष कृतीत सहभाग कमी प्रमाणात दिसून येतो. उदाहरणार्थ, प्लास्टिकचा वापर टाळणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे किंवा ऊर्जा बचत करणे या बाबींबाबत सर्व विद्यार्थी सातत्याने प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनाला प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित करण्यासाठी शैक्षणिक संस्था आणि समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

३. शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका स्पष्ट करणे

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी शिक्षण ही एक अत्यंत प्रभावी आणि दीर्घकालीन साधन असून ते शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव, सामाजिक जबाबदारी आणि संसाधनांचा योग्य वापर करण्याची सवय विकसित केली जाते. उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना विविध विषयांद्वारे शाश्वत विकासाची संकल्पना समजावून सांगतात. तसेच अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षण, हवामान बदल, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि सामाजिक विकास यांसारख्या विषयांचा समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयांची सखोल अशी माहिती मिळते. याशिवाय ग्रीन कॅम्पस संकल्पना, ऊर्जा बचत प्रकल्प, जलसंवर्धन उपक्रम, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण जनजागृती कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. अशा या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना निर्माण होते आहे. विद्यार्थी समाजात जाऊन पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करतात आणि शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा प्रसार होत आहे. त्यामुळे शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

निष्कर्ष (Conclusion)

प्रस्तुत संशोधनातून **शाश्वत विकास आणि उच्च शिक्षण यांच्यातील घनिष्ठ संबंध** स्पष्टपणे दिसतो. आधुनिक काळात पर्यावरणीय समस्या, नैसर्गिक संसाधनांचा वाढता वापर आणि हवामान बदल यांसारख्या आव्हानांमुळे शाश्वत विकासाची गरज अधिक अधोरेखित झालेली असल्याने या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत जागरूकता निर्माण करण्यात उच्च शिक्षण संस्थांची भूमिका पण अत्यंत महत्त्वाची आहे .

या संशोधन अभ्यासातून असे लक्षात येते की महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत काही प्रमाणात जागरूकता आहे आणि अनेक विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, पाणी बचत, ऊर्जा संवर्धन आणि स्वच्छता यांसारख्या बाबींचे महत्त्व समजलेले असल्याने ते महाविद्यालयांतील आयोजित करण्यात येणारे पर्यावरणीय कार्यक्रम, जनजागृती मोहिमा आणि ग्रीन कॅम्पस उपक्रम यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत आहे. तरीपण सर्व विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत सखोल समज आणि सक्रिय सहभाग अजूनही वाढविण्याची आवश्यकता आहे. त्या विद्यार्थ्यांचा सकारात्मक दृष्टिकोन प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित होण्यासाठी शिक्षण संस्थांनी अधिक प्रभावी कार्यक्रम, कार्यशाळा आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवीत आहे.

यावरून असे दिसून येते की **शिक्षण हे शाश्वत विकास साध्य करण्यासाठी अत्यंत प्रभावी साधन आहे**. उच्च शिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम, संशोधन आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव, सामाजिक जबाबदारी आणि संसाधनांचा योग्य वापर करण्याची सवय अजून विकसित केली तर भविष्यात शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होईल.

शिफारसी

१.अभ्यासक्रमात शाश्वत विकासाचा समावेश करणे

२. ग्रीन कॅम्पस उपक्रम राबविणे व अमलात आणणे. उदा.वृक्षारोपण, ऊर्जा बचत, जलसंवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकमुक्त परिसर यांसारख्या उपक्रमांचा समावेश केला पाहिजे.

३. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे विद्यार्थ्यांना वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलसंवर्धन प्रकल्प आणि पर्यावरणीय मोहिमांमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

५. संशोधन आणि प्रकल्पांना प्रोत्साहन देणे व संबंधित संशोधन प्रकल्प, सर्वेक्षण आणि अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

संदर्भसूची

१. पाटील, आर) .एस .2019). उच्च शिक्षण आणि सामाजिक विकास. पुणे प्रतिमा :प्रकाशन.

२. पाटील, बी) .आर .2018). शाश्वत विकास आणि पर्यावरण व्यवस्थापन. पुणे.डायमंड पब्लिकेशन्स :

३. Kothari, C. R. (2004). *Research Methodology: Methods and Techniques.* New Delhi: New Age International Publishers.

४. जोशी, एस) .एस .2016). **पर्यावरण अभ्यास**. पुणे.निराली प्रकाशन :

५ . विविध संशोधन लेख, शैक्षणिक नियतकालिके आणि इंटरनेटवरील विश्वसनीय संकेतस्थळे.